Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal ISSN No. 2456-1665

# महिला सशक्तीकरण

**प्रा. डॉ. अंकुशराव अंबादास चव्हाण**
विभाग प्रमुख तथा संशोधक मार्गदर्शक
राज्यशास्त्र विभाग
मत्स्योदरी कला महाविद्यालय तीर्थपुरी
मो.नं. ९५५२३८७२६६

महिला सशक्तीकरण हि प्रक्रिया लिंगभेदावर आधारित विषम समाज व्यवस्था नष्ट करून स्त्री-पुरुष समानतेवर आधारित नवी व्यवस्था निर्माण करणारी आंतरराष्ट्रीय चळवळ आहे. महिलांच्या विकासासी संबंधित असणारी अबला महिलांना सबलकरून त्यांना पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रामध्ये समान संधी उपलब्ध करून देणे हे महिला सबलीकरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये ऐतिहासिक काळापासून स्त्रीला जाणीवपूर्वक आणि पद्धतशीरपणे उपेक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. लिंग भेदावर आधारित विशमतेमधून स्त्रियांचे मोठ्या प्रमाणावर शोषण झाले परिणामी लिंगभेद आणि शोषणावर आधारित सामाजिक,राजकीय आणि आर्थिक व्यवस्था बदलवून स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने प्रगती आणि विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देणारी व्यवस्था निर्माण करण्याशी महिला सबलीकरणाची प्रक्रिया संबंधित आहे. ती एका चळवळीच्या रूपाने आंतरराष्ट्रीय पातळीवर विकसित झाली आहे. पुरुषांनी वर्षानुवर्षे स्त्रियांवर केलेल्या अन्यायाचा सूड उगविणे किवा स्त्री प्रधान समाज व्यवस्था निर्माण करणे हा या प्रक्रियेचा उद्देश नाही. त्यांची मागणी हि समानतेची आहे. स्त्रियांना पुरुषाबरोबर समान संधी,स्थान, दर्जा व प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी व समाजामध्ये महिलांना उपेक्षित ठेवणा तिच्या शोषणासाठी जबाबदार असणार्या शक्तीचे मतपरिवर्तन घडवून आणणे आवश्यक आहे. हा या प्रक्रियेचा मुळाशी असलेला विचार आहे.

स्त्री सबलीकरण या शब्दाची फोड केल्यास स्त्रीला सबल करणारी म्हणजेच दुर्बलता नष्ट करणारी तिच्या शरीर, मन, बुद्धीत स्वत्वाची जाणीव व स्वतःबद्दल जागरुकता निर्माण करून त्या दृष्टीने स्वयंवीकासासाठी प्रवृत्त करणारी एक संकल्पना होय. या दृष्टीने विकास, प्रगती व विविध क्षेत्रातील समान सहभाग व न्याय वागणुकी बाबत किवा संपूर्ण समता व न्याय निर्मितीच्या दृष्टीने विश्लेषण करणारी संकल्पना होय हे तिचे स्वरूप आहे.

स्त्री सबलीकरणाचा खरा अर्थ स्त्रीच्या बुद्धिमत्तेला निसर्गदत्त शक्तीला किवा कार्यक्षमताना सामर्थ्याला धारणक्षमतेला फुलविणे. तसेच स्वतःची खरी ओळख, विचार स्वातंत्र्य, अभिव्यक्ती आणि कृती तसेच तिच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्राला हाताळण्याचे सामर्थ्य तिच्यात निर्माण करणे आणि आंतरिक वातावरण निर्माण करून देणे त्यांचा जन्मजात गुणांचा वापर करून त्याचात आत्मविश्वास विकसित करणे. स्वतःचा आधार आणि सामाजिक, मानसिक व आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होऊन स्वयं प्रतिष्ठा प्राप्त करणे. तिच्या विरुद्ध होणार्या अन्याय व शोषणा विरुद्ध आवाज उठविणे व संघर्ष करण्याची पात्रता निर्माण करणे होय.

**व्याख्या :-**

**१) ग्रीफनच्या मते :-**

स्त्रीच्या बाबतीत सत्ता या शब्दाचा अर्थ स्त्रीच्या सत्तेत वाढ होय. तिचे नियंत्रन, तिचे ऐकणे, तिला समान नागरिक म्हणून मान्यता मिळणे, तसेच समाजात सक्रीय सहभाग घेण्याची पात्रता हि केवळ घरातच नव्हे तर समाजातील सर्वच स्तरावर सहभाग किवा योगदान देण्याची क्षमता निर्माण करणे. सत्तेचा दुसरा अर्थ स्त्रीचा सहभाग अधिकृत व मूल्यवान करणे होय.

**२) Country Report of Government of India :-**

मध्ये म्हटल्याप्रमाणे, सबलीकरण म्हणजे बळजबरीने दुर्बल ठेवण्याचा अवस्थेकडून शक्तीकडे वाटचाल होय. यादवारे स्त्रियांमध्ये स्वतःबद्दलची सकारात्मक प्रतिमा निर्माण होते. व त्यांचा क्षमतेत वाढ होते.

**3) नात व चटर्जीच्या मते :-**

खऱ्या सबलीकरणासाठी विचारावरील नियंत्रण, तत्वावरील नियंत्रण आणि आकलन शक्ती जि वैयक्तिक विश्वास किवा श्रद्धाना, तत्वांना आणि वृतीला आकार देते. आकलन विचार करणे जाणीव आणि विश्लेषण करण्याचा मार्ग होय. हे नियंत्रण निर्णय निर्धारण शक्तीत परावर्तीत होते. जातून विविध मार्ग विस्तारतात व संसाधनावरील नियंत्रण निश्चित होते.

**महिला सबलीकरणाचा अर्थ खालील मुद्यांचा आधारे स्पष्ट होते**

१) महिला सबलीकरण हि अधिकाराचा पुरस्कार करणारी आणि महिलाच्या विकासाशी संबंधित प्रक्रिया आहे.

२) महिलांना पुरुषाचा बरोबरीने विकास आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणे या प्रक्रियेत अपेक्षित आहे.

३) महिलांनासबलीकरणासाठी हा पुरुषांच्या बरोबरीनेसमान राजकीय आणि सामाजिक अधिकार मिळविण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर चाललेला संघर्ष आहे.

४) हि प्रक्रिया एका अशा व्यवस्थेचा निर्मितीशी संबंधित आहे ज्यामध्ये महिलांना समान स्थान, संधी, सत्ता, प्रतिष्ठा मिळते.

५) महिला सबलीकरण म्हणजे पुरुषांनी केलेल्या अन्यायाचा सूड उग्वीने किवा स्त्रीप्रधान समाज व्यवस्था निर्माण करणे नाही.

६) समाजामध्ये स्त्रियांना उपेक्षित ठेवणाऱ्या त्यांना आर्थिक सामाजिक आणि राजकीय लाभापासून वंचित ठेवणाऱ्या शक्तीमध्ये वैचारिक परिवर्तन घडवून आणणे, अशा प्रवाहाची दिशा बदलणे महिला सबलीकरणाचे अपेक्षित आहे.

७) समान संधीसाठी (Equality of Opportunity) प्रयत्न आणि लिंगभेदावर आधारित भेदाभेद नष्ट करणे, हि महिला सबलीकरण प्रक्रियेची दोन मुख्य उद्दिष्टे आहेत.

८) स्त्रियांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक जीवनाची गुणवत्ता सुधारणे त्याचप्रमाणे राजकीय, आर्थिक, सामाजिक, आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने समान हक्क आणि अधिकार प्राप्त करून देणे हा महिला सबलीकरण प्रक्रियेचा मुख्य भाग आहे.

९) शारीरिक आणि मानसिक हिंसाचारापासून महिलांची मुक्तता करणे यामध्ये अपेक्षित आहे.

**महिला सबलीकरण प्रक्रियेची उद्दिष्टे:**

**१. स्त्री पुरुष समानतेवर आधारित व्यवस्थेची निर्मिती:-**

पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार थांबविणे, हे महिला सबलीकरण प्रक्रियेचे उद्दिष्ट आहे. आज स्त्रियांना वैवाहिक हिंसाचार,हुंडाबळी , बलात्कार, सक्तीचा वेश्या व्यवसाय, स्त्रीयाची विक्री,लहान मुलाची हत्या, मारहाण, मादक पदार्थाची व्यसनाधीनता, आदि सारख्या शारीरीक आणि मानसिक छळाचा सहन करावे लागत आहे. स्त्रियांवर होणार्या अन्याय अत्याचारापासून त्याची मुक्तता करून विकास आणि प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देणे हा महिला सबलीकरण प्रक्रियेचा उद्देश आहे.

**२. महिला वरील अन्याय अत्याचार दूर करणे:-**

महिला सबलीकरण प्रक्रियेचे हे मुख्य उद्दिष्ट असून त्याशिवाय महिलांचे सबलीकरण साध्य होऊ शकणार नाही. पुरुष प्रधान संस्कृतीमधील लिंगभेदावर आधारित महिलांच्या शोषणाची प्रक्रिया नष्ट करून स्त्री पुरुष समानतेवर आधारित व्यवस्था निर्माण करण्यासाठी स्त्रीवादी संघटना सक्रीय आहेत. स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने विकासाच्या,प्रगतीच्या समानसंधी, प्रतिष्ठा, दर्जा,सत्ता प्राप्त करून देणारी व्यवस्था निर्माण करणे करणे हे महिला सबलीकरणाची पूर्व अट आहे.

**३. स्त्रियांना अठीक आणि सामाजिक न्याय मिळवून देणे :-**

पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये ऐतिहासिक काळापासून स्त्रियांना उपेक्षित ठेवण्यात आले. त्यांना मुलभूत, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय अधिकार नाकारण्यात आले. परिणामी स्त्रियांचा बुद्धिमत्तेचा कार्यक्षमतेचा विकास होऊ शकला नाही. स्त्रियांना आर्थिक आणि सामाजिक अधिकार मिळवून देऊन त्यांचा विकास साधने हे महिला सबलीकरण प्रक्रियेचे दुसरे महत्वाचे उद्दिष्टे आहे. आर्थिक आणि सामाजिक न्यायावर आधारित समाजव्यवस्थेची निर्मितीकरणे महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेत अभिप्रेत आहे.

**४. महिलांना रोजगाराभिमुख बनवून आर्थिक सबलीकरण घडवून आणणे :-**

स्त्रियांना दुय्यम आणि उपेक्षित वागणूक देण्यासाठी त्यांचे कार्यक्षेत्र केवळ चूल आणि मूल पुरतेच मर्यादित ठेवण्याची मानसिकता स्त्रियांचा खच्चीकरनाला मुख्यत्वे जबाबदार आहे. हि मानसिकता स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने विकासाच्या संधी नाकारते. समाजातील अशा मानसिकतेत बदल करून स्त्रियांचे खच्चीकरण थांबविणे हे महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेचे उद्दिष्टे आहे.

**५. स्त्रियांचे खच्चीकरण थांबविणे :-**

महिलांना आर्थिक अधिकार मिळवून देऊन त्यांना रोजगाराभिमुख बनविणे हे महिला सबलीकरण प्रक्रियेचे उद्दिष्ट आहे. स्त्री हा अर्थ व्यवस्थेचा महत्वाचा घटक आहे. स्त्रीला रोजगाराभिमुख बनविण्यातून दोन गोष्टी साध्य होणार आहेत. एक म्हणजे राष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल आणि दुसरे म्हणजे स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनेल. स्त्रीयावरील अन्याय, अत्याचार कमी करण्यासाठी त्यांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनविणे आवश्यक आहे.

**६. राजकीय निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविणे :-**

राजकीय निर्णय प्रक्रियेतील महत्वाच्या स्थानावर पुरुषांचीच मक्तेदारी आहे. भारतामध्ये स्त्रियांच्या राजकीय प्रक्रियेत सहभाग अत्यंत कमी आहे. राजकीय निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा साग्भाग वाढविणे गरजेचे आहे. कारण त्यातून महिलांच्या कल्याणासाठी, विकासासाठी विविध योजना आणणे

त्यांची अंमलबजावणी करणे शक्य होणार आहे. राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांचा साग्भाग वाढल्याने राजकारणातील वाढती गुन्हेगारी, भ्रष्टाचार कमी होण्यासाठी मदत होणार आहे.

**७. स्त्रियांना उपेक्षित ठेवणाऱ्या शक्तीचे मतपरिवर्तन :**

स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढवून त्यांचा मानसिक आणि बौद्धिक विकास घडवून आणणे हे महिला सालीकरण प्रक्रियेचे आणखी एक महत्वाचे उद्दिष्ट आहे. शिक्षणाद्वारे स्त्रियांमधील मानसिक आणि बौद्धिक क्षमतांचा विकास शक्य आहे. शिक्षणाद्वारे स्त्रियांमधील निरक्षरता हे स्त्रिया उपेक्षित राहण्यामागचे एक महत्वाचे कारण आहे. परिणामी अहिकाधिक स्त्रियांना साक्षर बनवून त्यांच्या मानसिक आणि बौद्धिक विकास घडवून आणणे या उद्दिष्टाला महिला सबलीकरण प्रक्रियेमध्ये प्राधान्य देण्यात आले आहे.

**८. स्त्रियांच्या मानसिक आणि बौद्धिक विकास करणे : -**

महिला व मुलिंना सारख्या प्रकारचे शिक्षण दिले जाईल महिलांच्या प्रती विषमता विश्वव्यापी शिक्षण, निरक्षरता, निर्मुलन शिक्षणात लिंगभेद संवेदनशील शिक्षण पद्धतीने मध्ये वाढ मुलींच्या जन्मदरात वाढ व शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा या विषयी विशेष प्रयत्न केले जातील शिक्षणात लिंग भेदभाव असमानता दूर करणारे केंद्र निर्माण केले जावेत.

**९. महिला सामाजिक सबलीकरण :-**

स्त्रियांना जाणीव पूर्वक उपेक्षित ठेवणाऱ्या सामाजिक शक्तीमध्ये मत परिवर्तन घडवून आणणे हे देखील महिला सबलीकरण प्रक्रियेचे एक महत्वाचे उद्दिष्ट आहे. स्त्रियांना गुलाम बनविणारी पुरुष प्रधान मानसिकता बदलण्यासाठी त्यांना नवीन दिशा देण्यासाठी महिला सबलीकरण प्रक्रियेअंतर्गत प्रयत्न होतो. स्त्रियांना दुय्यम लेखणारी मानसिकता बदलने तिच्या सबलीकरणासाठी आवश्यक आहे. हि मानसीकता बदलण्यासाठी विविध औपचारिक – अनौपचारिक साधनाचा वापर होत असतो.

**१०. सर्व क्षेत्रामध्ये स्त्रियांना समान संधी :**

राष्ट्राच्या विकास प्रक्रियेमध्ये स्त्रियांना सहभागी करून राष्ट्राचा विकास साधने हे महिला सबलीकरण प्रक्रियेचे उद्दिष्ट आहे. स्त्री हा राष्ट्र विकासाचा महत्वाचा घटक आहे. स्त्रियांना विकासात्मक कार्यामध्ये सहभागी होण्याची संधी नाकारल्यामुळे स्त्रियांचे आणि पर्यायाने राष्ट्राचे नुकसान होते. राष्ट्रविकास हि केवळ पुरुषाची जबाबदारी नाही स्त्रियादेखील त्यात महत्वाची भूमिका बजावू शकतात. हा महिला सबलीकरण प्रक्रियेचा विश्वास आहे.

**११. महिला सबलीकरणापासून राष्ट्र विकासाचे उद्दिष्ट :**

सर्वच क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने समान संधी उपलब्ध करून देऊन त्यांच्या बुद्धिमत्तेचा आणि कार्यक्षमतेचा वापर करून घेणे हे महिला सबलीकरण प्रक्रियेचे उद्दिष्ट आहे. स्त्रियांमध्ये बुद्धिमत्ता आणि कार्यक्षमता असून हि केवळ लिंगभेदावर आधारित विषम दृष्टिकोनामुळे स्त्रियांना संधी नाकारण्यात आली होते, समाजाचा एक मोठा घटक राष्ट्रीय विकासाच्या प्रक्रियेपासून अलिप्त ठेवल्या गेल्यापासून राष्ट्रीय विकासावर त्याचा निश्चितच विपरीत परिणाम झाला. परिणामी स्त्रियांना विकासाच्या सर्व क्षेत्रामध्ये समान संधी उपलब्ध करून देऊन राष्ट्रीय विकासाला हातभार लावण्याचे महिला सबलीकरण प्रक्रियेचे उद्दिष्ट आहे. अशा प्रकारे महिला विरुद्ध होणारे अपराधासाठी पुरुष प्रधान समाज, मानसिकता आणि सामाजिक रूढी परंपरा जबाबदार आहेत.

**संदर्भ सूची**

१. समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या ले. डॉ.ज.रा.शिंदे, डॉ.प्रशांत अमृतकर चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद पृ.क्र. १२९

२. Griffen. Vahessa (ed) women's Development and Empowerment, A Pacific Development Centre, Kula Lumpur, 1987 P. 117-118

३. Kapur Pramila, Family Social Human and Spiritual Values for women's Empowerment and gender equality, paper presented in the international Conference on gender equality through Empowerment Stratagies and approaches. Lacknow, India 1997.

४. Government of India, Forth World Conference of Women, Beijing 1995,Development ministry of Human Resources and Development, N. Delhi 1995. P. 116

५. Nath. Kamla and Milly Chatterjer 1996 why women? What politics center for social Research. N. Delhi P.4

६. समकालीन जागतिक राजकारण - डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, विद्या बुक्स पब्लीशेर्स औरंगाबाद २०११, पृ. ३४४, ३४५.

७. तत्रैव पृ. ३४६, ३४७

८. महिला सशक्तीकरण - रमा शर्मा, एम. के. मिश्रा,
अर्जुन पब्लिशिंग हाउस नवी दिल्ली, पृ.क्र. १०, ११, १२.